NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001
YEAR : 30 ) 15th September 2005 ( No : 06

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATIONS
*Vidyapeeth Vidyarthi Bhavan, "B" Road, Churchgate, Mumbai - 400 020*

# विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बिनडोकपणाचा तीव्र निषेध

## आयोगाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर केलाच पाहिजे व हायकोर्टाचा अवमान केल्याबद्दल क्षमा मागितली पाहिजे.

नेट सेट बाबतच्या दिनांक ३ ऑगस्ट २००५ रोजीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्राबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची प्रतिक्रिया नमूद असलेला प्रस्ताव

**ADOPTED**
**BY MFUCTO EXECUTIVE COMMITTEE MEETING**
**DATED 11.09.2005**

**१.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्यावतीने महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना पाठविण्यात आलेले दिनांक ३ ऑगस्ट २००५ रोजीचे पत्र काळजीपूर्वक विचारात घेण्यात आले. आता कुठे विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या विधिसल्लागारांचा सल्ला घेतला असून तीनचार वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर विधिसल्लागारांनी दिलेल्या योग्य सल्ल्याप्रमाणे कारवाई न करण्याच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या पत्रातुन डोकावणाऱ्या बिनडोकपणाचा तीव्र निषेध करण्यात येत आहे.

**२.** सन १९९१ पासून तर सन १९९९ पावेतोच्या काळात महाराष्ट्रामध्ये विधिवतरित्या नेमण्यात आलेल्या, मान्यताप्राप्त व नियमित सेवेत असलेल्या नेटसेट ग्रस्त शिक्षकांच्या संदर्भात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक ३० मार्च २००३ रोजी "MEMORANDUM TO THE UGC on appointment of teachers in the Universities and Colleges in Maharashtra and the NET/SET qualification condition" या विषयावर एक निवेदन पाठवून (यापूढे उल्लेख संघटनेचे निवेदन) या शिक्षकांना नेटसेटची अट लागू होत नाही ही गोष्ट स्पष्टपणे लक्षात आणून दिली होती.

(२.१) महाराष्ट्रामध्ये विद्यापीठ कायद्याने पात्रता ठरविण्याचे विधिमय माध्यम काय आहे? ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आली होती. याबाबतचा संघटनेच्या निवेदनातील परिच्छेद २ पुढील प्रमाणे :-

"2. LAWFUL INSTRUMENT FOR PRESCRIBING QUALIFICATIONS :

2.1 The Non-Agricultural Universities in Maharashtra, viz, University of Mumbai, SNDT Women's University, University of Pune, Nagpur University, Amravati University, Shivaji University, North Maharashtra University, Dr. Babasaheb Marathwada University and Ramanand Tirth University are governed by the provisions of the Maharashtra Universities Act, 1994. Section 51(8) of the said Act provides that Recruitment and Qualifications of the teachers of the Universities and the affiliated colleges is to be regulated by Statutes to be made by the Universities. In case Statutes do not exist or where Statutes exist but they need to be amended, and if in the opinion of the Universities it is likely to take time before new Statutes could be brought into existence or existing Statutes could be amended,

*चार महिन्यात निर्णय घेण्याचा स्पष्ट आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेला असतांना चार वर्षे होत आली तरी विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय कां घेतला नाही? याचा नुसता खुलासा करुन चालणार नाही तर त्याबद्दल विद्यापीठ अनुदान आयोगाने मा. उच्च न्यायालयाची क्षमा मागितली पाहिजे.*

Section 14(8) of the Act provides the Vice Chancellors with powers to issue directions.

2.2 Section 8(3) of the said Act empowers the State Government to issue **Standard Cod**e for the purpose of securing and maintaining uniform standards by Notification in the official Gazette.

2.3 It may be pointed out that the UGC is fully aware of such provisions in the Universities Act in different States in the country and therefore in all the Regulations/ Notifications that the UGC has been issuing from time to time, the UGC has been emphasizing that it would be necessary for the Universities to make Statutes to implement the UGC Notifications/Regulations."

(२.२) महाराष्ट्रामध्ये शासनाने नेटसेटची पात्रता परीक्षा विधिमय माध्यमांच्याद्वारे कधीच सक्तीची केली नाही ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आली होती. याबाबतचा संघटनेच्या निवेदनातील परिच्छेद ३.५ पुढील प्रमाणे :-

"3.5 Thus, it is clear that instead of firmly introducing NET/SET as compulsory entry point qualification condition for recruitment of candidates through the competent legal instruments such as the Standard Code, the State Government took resort to informal instruments paying lip sympathy to the UGC directions.

3.6 In Maharashtra, NET/SET qualification, though stated from time to time by the Government, **was never brought into existence as entry point qualification condition by the lawful machinery,** viz,. the Statutes or Directions by the Vice Chancellor of the Universities or the Standard Code by the State Government."

(२.३) जुन्या पात्रतेच्या जागी नेटसेटचा समावेश असलेली नवीन पात्रता महाराष्ट्रामध्ये लागू होण्याची "कट ऑफ डेट" कोणती? ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आली होती. याबाबतचा संघटनेच्या निवेदनातील परिच्छेद ५.२ पुढील प्रमाणे :-

"5.2 With reference to old qualification, new qualification and the **cut off date,** it is necessary to point out that old arrangement for recruitment in the teaching cadre consists of -

(i) qualifications prescribed by clause 8 in the GR dated 27th February 1989 (page 17 of the booklet) which had become Statute and which reads as "Generally the minimum qualifications for appointment to the post of Lecturer in the scale of pay of Rs. 2200-4000 shall be a master's degree in the relevant subject with at least 55% of marks, or its equivalent grade and good academic record"; and

(ii) selection committees prescribed in clause 9 of the same Statute which reads as "the Selection Committee has already been laid down in the Appendix accompanying Government Resolution, Education and Youth Services Department No. USG.1177/129387/XXXII (Cell), dated 25th October 1977". This also was converted into Statute in all the Universities in the State.

This arrangement was continued to be in operation till it was replaced by the new arrangement which came into existence by issuance of directions by the Vice Chancellors. For instance, in Amravati University it was done by Direction No. 7 of 1999 dated 30th December 1999 and in other Universities in the State also around the same date. These prescribed the new qualifications making the NET/SET compulsory at the recruitment level and composition of selection committees for recruitment in the teaching cadre. These directions in some of the Universities have been converted into Statutes and in some others they are in the process of being done. Thus it is crystal clear that the lawful cut off date for demarking old arrangement and new arrangement is 30th December 1999 or a few days prior to that or a few days thereafter. According to the Hon'ble Supreme Court of India decision, NET/SET would not be applicable to them."

(२.४) नेट सेट ची पात्रता पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाही असा स्पष्ट निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आली होती. याबाबतचा संघटनेच्या निवेदनातील परिच्छेद ४.१ पुढील प्रमाणे :-

"4.1 In the University of Delhi V/s Raj Singh and Others, the Hon'ble Supreme Court (AIR 1995, SC, 336)

## UNIVERSITY GRANTS COMMISSION

BAHADUR SHAH ZAFAR MARG : NEW DELHI-110 002

**F.1-11/97 (PS) : 3 August, 2005**

Prof. C.R.Sadasivan
President, Maharashtra Federation of University & College Teachers Organization (MFUCTO)
R.K.Gokuldham, A/205. S.V.Road, Borivli (West)
Mumbai-400 092.

**Subject :** Regarding the appointment... Teachers in the Universities and College in Maharashtra and the NET/SET qualification condition.

Sir,

With reference to your letter dated 29-3-2005 on the above subject, I am directed to say that the UGC has been considering the proposals received from Maharashtra State's Universities for exemption from NET/ SET on merit. A meeting of the Exemption Committee has already been held on 11th, 12th April, 2005 in Mumbai.

However, the matter was referred to our legal Consultant also, who has also suggested that the UGC should consider the cases for selection of various candidates on merit within the parameters of relaxation as contemplated under the UGC regulations of 1991 and 2000 if applications are forwarded **by the College/ Institution through the University as directed by the Bombay High Court.**

Yours faithfully,
**(K.C.Mahur)**
Section Officer

while dealing with the UGC Notification dated 19th September 1991 ruled that **(i) Regulations are valid; (ii) They are recommendatory in character; and (iii) the application of the provisions was prospective.**"

(२.५) या सर्व शिक्षकांच्या नेमणुका संपूर्णपणे कायदेशीर होत्या ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आली होती. याबाबतचा संघटनेच्या निवेदनातील परिच्छेद ३.१० पुढील प्रमाणे :-

"3.10 All the Lecturers, barring a few, appointed during this entire period were through duly constituted Selection Committees as per the UGC requirements. By not introducing NET/SET as entry point qualification condition, as already pointed out hereinbefore, several hundreds of Lecturers were recruited with PG qualifications with B+ (55% or more) and good academic record through properly constituted selection committes but without NET/SET. **This process went on from 19th September 1991 almost till 30th December 1999** (in Amravati University area) and almost till that date in other University areas. All these appointments were also after the posts in which they were selected being advertised as per the requirements of law. All such appointments were approved by the Universities concerned and their posts were covered by 100 per cent salary grant-in-aid by the State Government. These Lecturers continue to hold their posts and continue to be paid salaries and covered by the salary grants-in-aid including payment of arrears on account of the revision of pay scales under the Fifth Pay Commission. In fact, the State Government in its GR dated 18th October 2001 has placed on record that more than 6000 Lecturers fall under this category."

(२.६) या सर्व शिक्षकांना (किंवा त्यापैकी कोणालाही) सेवामुक्त करणे बेकायदेशीर आहे ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आली होती. याबाबतचा संघटनेच्या निवेदनातील परिच्छेद ४.५ पुढील प्रमाणे :-

"4.5 The services of such teachers could not be terminated for the reasons that

a) They were selected by duly constituted selection committee;

b) As candidates, they possessed the then requisite minimum qualification prescribed under the Statute;

c) All these cases fell under Second Proviso to Clause 2 of the UGC Regulation, 2000;

d) The decision of the Hon'ble Supreme Court in University of Delhi V/s. Raj Singh & Others applied to them;

e) The UGC Regulations applied only to candidates who wanted to become Lecturers and not to the Lecturers who were already appointed;

f) The second Proviso to Clause 2 was only to be prospective in operation and not retrospective;

g) After the Government and the Universities prescribed NET/SET as minimum entry point conditions for Lecturers with a clear direction that no non NET/SET candidate should be appointed as Lecturer, the Universities did not appoint any such candidates as Lecturers and when the colleges appointed such candidates, the Universities have rejected approval of such appointments."

**३.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने दिनांक ३० मार्च २००३ रोजी सर्व सहपत्रासह तपशीलवार निवेदन पाठवून या सर्व बाबी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देऊन याबाबत महासंघाचे म्हणणे ऐकून घ्यावे अशी विनंती संघटनेच्या अध्यक्ष व सचिवांनी पुढील शब्दात केली होती.

"5.4 In view of the foregoing, the MFUCTO requests that the UGC

(a) Immediately issue direction to all Non Agricultural Universities in Maharashtra that in respect of Lecturers appointed prior to the cut off date, viz. 30th December 1999, NET/SET qualification condition is not applicable; and

(b) Consider the cases of all those Lecturers who have been appointed after the cut off date without NET/SET for the purpose of considering eligibility for relaxation from the NET/SET qualification as per the First Proviso to qualifications contained in the UGC Regulation called the UGC (Minimum Qualifications required for the appointment and Career Advancement of teachers in Universities and institutions affiliated to it Regulation 2000 dated 4th April 2000." संघटनेचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाला अजूनही वेळ मिळालेला नाही हे नमूद करतांना संघटनेला तीव्र दुःख होत आहे.

**४.** हजारो शिक्षकांच्या जीवनाशी खेळ चालला असतांना या प्रश्नावर विद्यापीठ अनुदान आयोग झोपा काढत होते असे स्पष्टपणे दिसून येते. संघटनेने याबाबत वारंवार पत्रव्यवहार केला. पण विद्यापीठ अनुदान आयोगाची झोप काही उघडत नव्हती. शेवटी तब्बल दोन वर्षांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला थोडीशी जाग आली व २३ मार्च २००५ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सेक्शन ऑफीसरने महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या सरचिटणीसांना पत्र पाठवून पुढीलप्रमाणे कळविले. :-

"With reference to your letter dated 24.12.04 received in this office in Feb. 2005 on the above subject, I am directed to request you to send all the enclosures/references quoted in the letter/Memorandum at an early date, to enable the Commission to consider the matter."

**५.** संघटनेच्या सरकार्यवाहांनी २३ मार्च २००५ रोजीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्राला तावडतोबच २९ मार्च २००५ रोजी उत्तर देवून ही सारी कागदपत्रे पुन्हा त्यांच्याकडे पाठविली, मात्र असे करतांना ही सारी कागदपत्रे तुम्हाला दोन वर्षापूर्वीच पाठविली होती असेही त्यांना पुढील शब्दात कळविले होते :-

"This has reference to your letter No. F1-11/97(PS), dated 23 rd March 2005 in connection with MFUCTO's letter dated 24 th December 2004. You have asked me to send to you the enclosures/references quoted in the letter/

*सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेटसेट बाबतच्या १९९१ च्या रेग्युलेशनचे तपशीलवार विश्लेषण करणारा निवाडा दिनांक ८.९.१९९४ रोजी दिला असून हे रेग्युलेशन शिफारसींच्या स्वरुपाचे (The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character.) आहे. ते सक्तीचे करावयाचे किंवा नाही याबाबतचा निर्णय विद्यापीठाने वा शासनाने घ्यावयाचा आहे. तसा निर्णय घेण्यात आल्यास तो परिनियम किंवा प्रमाणसंहिता निर्गमित केल्यानंतरच्या काळात (The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective.) लागू पडेल, पूर्वलक्षी प्रभावाने नव्हे. हे रेग्युलेशन उमेदवारासाठी (Relates to all applicants i.e. candidates) लागू आहेत, असे त्या निर्णयामध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे.*

memorandum. In this connection, I wish to state that the MFUCTO had sent all the necessary accompaniments to the Memorandum dated 30 th March 2003. In fact, there has been a few more letters written from time to time as reminders to the UGC Chairman. I had also met the UGC Chairman, Dr. Arun Nigvekar impromptu sometime in January along with the AIFUCTO delegation and discussed this matter. However, since you are in need of the said documents, I am sending the same to you with this letter." याच पत्राच्या शेवटी संघटनेच्या वतीने विद्यापीठ अनुदान आयोगाला पुन्हा अशी विनंती करण्यात आली होती की :-

"In the light of these facts, it is once again requested that the Chairman may be moved so that the delegation of the MFUCTO could meet him. The date of the meeting may be intimated well in advance of at least 10-12 days so that the members of the deputation from the different parts of Maharashtra would be in a position to reach New Delhi in time by prearrangement."

६. दरम्यानच्या काळात हायकोर्टाने सांगितलेल्या प्रकरणात 'नेटसेट मुक्ती' देण्या किंवा न देण्याचा प्रश्न तसाच बाजूला ठेवून 'कट ऑफ डेट' पूर्वीची शेकडो प्रकरणे आपल्या निर्णयासाठी पाठविण्याचे जोरदार इशारे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विद्यापीठांना देण्यात आले व महाराष्ट्रातील एखाद्या दुसऱ्या विद्यापीठाचा अपवाद सोडला तर "आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास सुरू झाल्यासारखी" महाराष्ट्रातील विद्यापीठांनी ट्रंका भरभरून (सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात) 'कट ऑप डेट' पूर्वी नेमलेल्या व ज्यांच्या नेमणुकीच्या वेळी नेटसेट पात्रता कायद्याने लागूच झालेली नव्हती अशा शेकडो अधिव्याख्यांत्यांची प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे 'नेटसेट मुक्ती'साठी विचारार्थ पाठविली.

७. विद्यापीठ अनुदान आयोगाची याबाबतीतील एक हुशारी मान्य केलीच पाहिजे, ती अशी की विद्यापीठाकडे किंवा शासनाकडे पाठविलेल्या कोणत्याही पत्रव्यवहारामध्ये कोणत्या तारखेनंतरची प्रकरणे पाठवावयाची आहेत याचा उल्लेख विद्यापीठ अनुदान आयोगाने कटाक्षाने टाळला आहे. 'कट ऑफ डेट' पूर्वीची प्रकरणे विचारार्थ घेण्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा भंग होतो याची हमखास जाणीव असल्यामुळेच तारखेचा उल्लेख विद्यापीठ अनुदान आयोगाने टाळलेला आहे. "तुम्हाला जी प्रकरणे पाठवावयाची असतील ती पाठवा पण प्रत्येक प्रकरण स्वतंत्रपणे पाठवा." असे साचेबंद वाक्य विद्यापीठ अनुदान आयोगाने या सर्व पत्रव्यवहारात वापरलेले दिसते. पण दिल्लीत व मुंबईत झालेल्या बैठकीमध्ये मात्र १९९१ ते १९९९ च्या काळातील सर्व प्रकरणे पाठविण्याचे मुबलक तोंडी इशारे त्यांनी दिले. लेखी आदेश न देता तोंडी इशारे देण्यातील नाजूक भाग न कळल्यामुळे सरळ मनाच्या महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण संचालकांनी आपल्या दिनांक २८.१०.२००४ रोजीच्या पत्रात "दिनांक १९.९.१९९१ नंतर अधिव्याख्याता म्हणून सेवेत रुजु झालेल्या व नेटसेट परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या अधिव्याख्यात्यांची सर्व प्रकरणे तिकडे पाठवावयाची आहेत" असे कळवून टाकले. 'कट ऑफ डेट' पूर्वीच्या प्रकरणांचा महापूर महाराष्ट्रातून युजीसीकडे पाठविण्यात आला.

८. एका बाजूला सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात जाऊन हा सारा गोंधळ महाराष्ट्रात उडवून दिलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाने दुसऱ्या बाजूला महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला आपले म्हणणे मांडण्याची दोन मिनिटांचीसुद्धा संधी दिली नाही. शेवटी महासंघाने या बाबतीत कायदेशीर नोटीस बजावण्याचा निर्णय घेतला. ज्येष्ठ अधिवक्ते श्री.एन.एम. गांगुली यांनी महासंघाच्या (पक्षकाराच्या) वतीने दिनांक १२ एप्रिल २००५ रोजी बजावलेल्या या नोटीसमधील परिच्छेद २४ पुढील प्रमाणे आहे. :-

"24. My clients state that my clients through letter dated 30th March 2003 submitted a Memorandum to the U.G.C. to bring to the notice of the U.G.C. all material facts including the two judgments of the Hon'ble Division Bench of the Hon'ble High Court at Bombay and sought a meeting for the MFUCTO delegation with the U.G.C. to present the Memorandum in person and to explain all the relevant facts as also the Hon'ble Court Judgments. My client as the then General Secretary also telephonically talked to Shri. Sharma, personal Assistant to the chairman of the U.G.C. in connection with getting a date for the meeting for the delegation of the MFUCTO and also on the same date talked to the Chairman himself. It was assured that as soon as the relevant papers reach the U.G.C. office, meeting would be convened with the MFUCTO. The U.G.C. by its letter No. F-1-11/97(PS) dated 6th May 2003 also assured that the contents of the Memorandum would be duly considered. However, no meeting was fixed, nor was the MFUCTO called by the U.G.C. Committee which came to Mumbai and held meeting with the Government and the University

## नागपूर विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाला कळविलेली कायद्यावर आधारित ठाम भूमिका

**"(f) Instead of firmly introducing NET/SET as a compulsory qualification at recruitment level by the competent legal instrument such as Standard Code, the State Govt. was constantly introducing NET/SET qualification by informal instruments and was simultaneously enjoying the benefits of not introducing it. Since NET/SET was not inducted as a compulsory qualification at the recruitment level by legal instrument , hundreds of candidates without NET/SET, were recruited from 1991 till the cut-off date i.e. 28.12.1999 in this university area. Advertisements were approved, Selections were made, approvals were granted by the university and; because it was the perfectly lawful recruitment in the teaching cadre, 100% salary grants were paid by the State Govt. in respect of such lawfully recruited teachers year after years and continue to be so paid even to-day."**

*- Para 6 (f) of the letter No.NU/CS/02 Dated : 17th December, 2002, from Registrar, (With the approval of the Hon.Vice Chancellor) Nagpur University, Nagpur, To The Secretary, University Grants Commission, Bahadurshah Zafar Marg, NEW DELHI- 110 002*

officials in connection with the issue of exemption to Non-NET/SET teachers. My clients point out that had they been also summoned to meet the U.G.C. or at least the said U.G.C. Committee, the serious wrong steps that the U.G.C. Committee has taken by misinterpreting the two judgments of the Hon'ble Division Bench of the Hon'ble High Court, could have been avoided and the issue settled. The MFUCTO submitted reminder letters dated 9th June 2003 and dated 24th December 2004. Thereafter the U.G.C. was pleased to send letter No. F-1-11/97(PS), dated 23rd March 2005 calling upon the MFUCTO, to submit documents referred to in the Memorandum. Though the said documents were already submitted at the material time by the MFUCTO, my clients have once again submitted by its letter dated 29th March 2005 the said documents yet again and requested for a meeting with the U.G.C."

**९.** आता ३ ऑगस्ट २००५ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने महासंघाला पाठविलेल्या पत्रातून सुद्धा महासंघाचे म्हणणे ऐकून घेण्याची बुद्धी आयोगाला सुचल्याचे दिसून येत नाही. मात्र २-३ वर्षाच्या प्रदीर्घ कालहरणानंतर विधी सल्लागारांचा सल्ला घेण्याची गरज विद्यापीठ अनुदान आयोगाला वाटली, त्यांनी तसा तो सल्ला घेतला व त्यांच्या विधी सल्लागारांनी त्यांना स्पष्ट शब्दात मुंबई उच्च न्यायालयाने सांगितल्याप्रमाणे कृती करा असा रोखठोक सल्ला दिला आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे तरी दुसरे काय म्हणणे आहे? विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्रातील हा महत्त्वाचा भाग पुढील प्रमाणे :-

"However, the matter was referred to our legal Consultant also, who has also suggested that the UGC should consider the cases for selection of various candidates on merit within the parameters of relaxation as contemplated under the UGC regulations of 1991 and 2000 if applications are forwarded by the College/Institution through the University as directed by the Bombay High Court."

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विधिसल्लागारांनी दिलेल्या या सल्ल्यामुळे गेले अनेक महिने सुरू असलेले विद्यापीठ अनुदान आयोगाचे बिनडोकपणाचे वागणे उघड्यावर पडले आहे.

**१०.** कायदेशीररित्या नेटसेटची पात्रता लागूच झालेली नव्हती त्याकाळात विधीवतरित्या सेवेत आलेल्या, 'कट ऑफ डेट' पूर्वीच्या सन १९९१ ते ९९ या काळात भरती झालेल्या, जवळ जवळ १० हजार तरुण अधिव्याख्यात्यांच्या व्यावसायिक जीवनामध्ये कमालीची अस्वस्थता निर्माण करणारे किळसवाणे वर्तन विद्यापीठ अनुदान आयोगाने ताबडतोब बंद केले पाहिजे. विद्यापीठ अनुदान आयोगाने या क्षेत्रातील राष्ट्रीय पातळीवरील विधिमय शिर्षस्थ संस्था या नात्याने ठामपणाने पुढील बाबी विचारात घेऊन निर्णय घेतले पाहिजेत.:-

(१) "तुम्हाला जी प्रकरणे पाठवावयाची असतील ती पाठवा पण प्रत्येक प्रकरण स्वतंत्रपणे पाठवा" ही भंपक, पोकळ, निरर्थक व बिनबुडाची ठोकळेबाज भूमिका बाजूला ठेवून महाराष्ट्रामध्ये याबाबतची 'कट ऑफ डेट' कोणती याची तारीख ठरविणारा निश्चित निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाला करावाच लागेल. 'सोमवार'नंतर पीएच.डी.ची पदवी प्राप्त केली तरी नेटसेट पासून मुक्ती नाही, मात्र 'सोमवार'पूर्वी नुसता प्रबंध सादर केल्याचे प्रमाणपत्र जरी आणले तरी नेटसेट करण्याची गरज नाही अशा अर्थाचे एक 'व्रत' विद्यापीठ अनुदान आयोगाने जाहीर केल्यामुळे अगोदरच हास्यास्पद म्हणून देशभर किर्तिमान झालेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाला महाराष्ट्रात 'कट ऑफ डेट' निश्चितपणे कोणती आहे.? याचा ठाम निर्णय करूनच शोभायमान होता येईल याचा आयोगाने विसर पडू देता कामा नये.

(२) महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठांनी ही 'कट ऑफ डेट' त्यांना कळविली असून तो मजकूर काळजीपूर्वक वाचण्याची तसदी विद्यापीठ अनुदान आयोगाला घ्यावी लागेल. १९९९ च्या शेवटापर्यंत कायद्याने नेटसेटची अट महाराष्ट्रात सक्तीची करण्यात आलेली नव्हती याची सर्वात उत्तम जाणीव महाराष्ट्र शासनाला होती व म्हणूनच महाराष्ट्र शासनाने प्रथम १९९५ मध्ये "नेटसेट उत्तीर्ण करण्याची दिनांक ३१.३.१९९६ ची मुदत या आदेशाद्वारे काढून टाकण्यात येत आहे" असा शासननिर्णय (२२.१२.१९९५) निर्गमित केला व त्यानंतर १९९९ मध्ये बिगर नेटसेट धारक "अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करण्यात येत आहेत" असा शासननिर्णय (१८.११.२००१) काढला. विद्यापीठ अनुदान आयोगाला हे दस्तऐवज पहावेच लागतील.

(३) महाराष्ट्रातील अनेक कुलगुरुंनी विद्यापीठ अनुदान आयोगाला ही गोष्ट वारंवार कळविली. एका मा. कुलगुरुंनी विद्यापीठ अनुदान आयोगाला डिसेंबर २००२ मध्ये 'ऑफिशीयल मेमोरंडम' पाठवून ठामपणे असे ठणकावले की :-

" Instead of firmly introducing NET/SET as a compulsory qualification at recruitment level by the competent legal instrument such as Standard Code, The State Govt. was constantly introducing NET/SET qualification by informal instruments and was simultenously enjoying the benefits of not introducing it. Since NET/SET was not inducted as a compulsory qualification at the recruitment level by legal instrument, hundreds of candidates, without NET/SET, were recruited from 1991 till the cutoff date i.e. 30.12.1999 in this university area. Advertisements were approved, selections were made, approvals were granted by the university, and because it was the perfectly lawful recruitment in the teaching cadre, 100% salary grants were paid by the State Govt. in respect of such lawfully recruited teachers year after years and continued to be so paid even today."

जे कायद्यातच नव्हते त्याची अंमलबजावणी होणार कशी? इतक्याउपर आम्ही म्हणतो तोच कायदा आहे असे विद्यापीठ अनुदान आयोगाचे म्हणणे असेल तर, असा कसा हा तुमचा कायदा? दहा वर्षामध्ये १० हजारावर लोक सेवेत भरती झाले तेंव्हा ते कायदाकर्ते आयोग काय करीत होते? तो कायदा होता आणि आम्ही झोपा काढत होतो अशी दोन होकाराची तरी भूमिका घ्यावी लागेल किंवा आम्ही झोपलेले नव्हतो व तो त्यावेळी कायदा नव्हता अशी दोन नकाराची तरी भूमिका घ्यावी लागेल. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या गलथानपणामुळे होरपळून निघालेल्या महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांना भूमिकाच न घेण्याची विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका अजिबात मान्य नाही हे ठामपणे नमूद करण्यात येत आहे.

(४) सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेटसेट बाबतच्या १९९१ च्या रेग्युलेशनचे तपशीलवार विश्लेषण करणारा निवाडा दिनांक ८.९.१९९४ रोजी दिला असून हे रेग्युलेशन शिफारसींच्या स्वरुपाचे (The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character.) आहे. ते सक्तीचे करावयाचे किंवा नाही याबाबतचा निर्णय विद्यापीठाने वा शासनाने घ्यावयाचा आहे. तसा निर्णय घेण्यात आल्यास तो परिनियम किंवा प्रमाणसंहिता निर्गमित केल्यानंतरच्या काळात (The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective.) लागू पडेल, पूर्वलक्षी प्रभावाने नव्हे. हे रेग्युलेशन उमेदवारासाठी (Relates to all applicants

***नेटसेट पात्रता परीक्षा सक्तीची करणाऱ्या ४ एप्रिल २००० रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने काढलेल्या नव्या रेग्युलेशनच्या दुसऱ्या परिच्छेदात " Provided further that these regulations shall not be applicable to such cases where selections of the candidates having had the then requisite minimum qualification as were existing at that time through duly constituted Selection Committees for making appointments to the teaching posts have been made prior to the enforcement of these regulations." हे दुसरे परंतुक विद्यापीठ अनुदान आयोगाला कां टाकावे लागले होते? याचाही खुलासा विद्यापीठ अनुदान आयोगाला करावाच लागेल.***

i.e. candidates) लागू आहेत, असे त्या निर्णयामध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे.

(५) मा. सर्वोच्च न्यायालयाने याच प्रकरणात दिलेल्या निर्णयातील २४ वा परिच्छेद पुढील प्रमाणे आहे. :-

" **24.** It is now appropriate to clarify the direction that the Delhi High Court issued in allowing the writ petition. It held that the notification dated 19th September, 1991, by which the said Regulations were published, was valid and mandatory and the Delhi University was obliged under law to comply therewith. The Delhi University was directed to select lecturers for itself and its affiliated and subordinate colleges strictly in accordance with the notification. Put shortly, the Delhi University is mandated to comply with the said Regulations. As analysed above, therefore, the Delhi University may appoint as a lecturer in itself and its affiliated colleges one who has cleared the test prescribed by the said Regulations; or it may seek prior approval for the relaxation of this requirement in a specific case; or it may appoint as lecturer one who does not meet this requirement without having first obtained the UGC s approval, in which event it would, if it failed to show cause for its failure to abide by the said Regulations to the satisfaction of the U.G.C. forfeit its grant from the U.G.C. If, however, it did show cause to the satisfaction of the U.G.C., it not only would not forfeit its grant but the appointment made without obtaining the U.G.C.'s prior approval would stand regularised."

(६) दिनांक ३ जून १९९२ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष प्रा.जी.राम रेड्डी यांनी महाराष्ट्राचे शिक्षण व तंत्र शिक्षण मंत्री श्री. अनंतराव थोपटे यांना लिहिलेल्या पत्रामध्ये "The Universities must be persuaded and urged by the state Government to amend their statute forthwith requiring appointment of lecturer through interview out of the candidates who have passed UGC or state-NET " विद्यापीठ अनुदान आयोगाच्या त्यावेळच्या अध्यक्षांनी केलेल्या या विनंतीचा अर्थ आजच्या अध्यक्षांना कळत नाही असे कसे म्हणता येईल? नेटसेट पात्रता परीक्षा सक्तीची करण्यासाठी विद्यापीठाचे परिनियम दुरुस्त करण्याचा सल्ला ८ जून १९९४ च्या पत्राने विद्यापीठ अनुदान आयोगाने दिला होता. विद्यापीठ अनुदान आयोगाचे १९९१ चे रेग्युलेशन सक्तीचे होते ही गोष्ट जर खरी आहे तर मग "University Statutes must be amended to reflect teacher's qualifications and eligibility requirements prescribed in UGC Regulations." अशी विनंती १९९४ मध्ये, त्यापूर्वी व त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून महाराष्ट्र शासनाला व महाराष्ट्रातील विद्यापीठांना वारंवार का केली जात होती? याचा खुलासा विद्यापीठ अनुदान आयोगाला करावाच लागेल.

(७) नेटसेट पात्रता परीक्षा सक्तीची करणाऱ्या ४ एप्रिल २००० रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने काढलेल्या नव्या रेग्युलेशनच्या दुसऱ्या परिच्छेदात "Provided further that these regulations shall not be applicable to such cases where selections of the candidates having had the then requisite minimum qualification as were existing at that time through duly constituted Selection Committees for making appointments to the teaching posts have been made prior to the enforcement of these regulations." हे दुसरे परंतुक विद्यापीठ अनुदान आयोगाला कां टाकावे लागले होते? याचाही खुलासा विद्यापीठ अनुदान आयोगाला करावाच लागेल.

(८) खरे म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोगाने मुळात "नेटसेट असल्याशिवाय वरिष्ठ किंवा निवडश्रेणी दिली जाणार नाही" अशी भूमिका घेतली होती. २४ डिसेंबर १९९८ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेच्या परिच्छेद ८.४. मध्ये ही भूमिका नमूद आहे. "सेवेत भरती झाल्यावर, प्लेसमेंटच्या वेळी अशी अट लादल्यामुळे नेटसेटची अट पूर्वलक्षी प्रभावाने लादण्याचे, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अधिक्षेप करणारे पाप तुमच्या हातून घडेल." ही गोष्ट संघटनांनी लक्षात आणून दिल्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाने आपली भूमिका बदलली व नेटसेट बाबतच्या आपल्या पूर्वीच्या सर्व अधिसूचना रद्द केल्या व ४ एप्रिल २००० चे रेग्युलेशन समाविष्ट असलेली अधिसूचना निर्गमित केली. ४ एप्रिल २००० च्या रेग्युलेशनच्या परिच्छेद २ च्या दुसऱ्या परंतुकाची जन्मकुंडली ही अशी आहे. ही गोष्ट आम्हाला अजिबात माहीत नाही असे विद्यापीठ अनुदान आयोगाला कसे म्हणता येईल?

(९) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विधीसल्लागारांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला धरून कारवाई करावी असा सल्ला विद्यापीठ अनुदान आयोगाला दिला आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने २००१ च्या याचिका क्रमांक ५०२२ मध्ये दिनांक २० फेब्रुवारी २००२ रोजी दिलेल्या निर्णयाच्या निकालात स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की :-

"We also hold that the cases of candidates appointed from 12th October, 1999 till 18th October, 2000 are required to be examined so as to ascertain the applicability of the first proviso to clause 2 of the 1991 Regulations as well as 2000 Regulations before their services are sought to be terminated by the respective universities and/ or colleges/ institutions." याचा अर्थ "१२ ऑक्टोबर १९९९ ते १८ ऑक्टोबर २००० या काळातील प्रकरणांची छाननी करावी" असा हा निर्णय आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयाने २००१ च्या याचिका क्रमांक ५७८२मध्ये दिनांक १४ एप्रिल २००२ रोजी दिलेल्या निर्णयाच्या निकालात स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की :-

"7. In the event the UGC takes decision adverse to the interests of teachers the management and the University are directed not to act upon it for a **period of four weeks from the date of communication** by UGC to the college through the University. **In the result the petitions mentioned in the schedule to this order are disposed of by this order.....** Except those petitions mentioned to be heard separately, rest of the petitions mentioned in the schedule are covered by this order and are accordingly disposed."

या निर्णयात शेवटी परिशिष्ट देण्यात आले असून त्या परिशिष्टात दिलेल्या १०४ प्रकरणांची छाननी करुन विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय घ्यावा असे नमूद असतांना त्या निकालाचे निमित्त करुन विद्यापीठ अनुदान आयोगाने सन १९९१ ते १९९९ या काळातील सर्व प्रकरणांची छाननी हाती घ्यावी ही गोष्ट मा. उच्च न्यायालयाचा अवमान करणारी आहे. अशा स्थितीत १९९९ पूर्वीची प्रकरणे सुनावणीसाठी मागण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा अट्टाहास कशापोटी? हे जाणून घेण्याचा महाराष्ट्रातील शिक्षकांना अधिकार आहे.

(१०) चार महिन्यात निर्णय घेण्याचा स्पष्ट आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेला असतांना चार वर्षे होत आली तरी विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय कां घेतला नाही? याचा नुसता खुलासा करुन चालणार नाही तर त्याबद्दल

**जे कायद्यातच नव्हते त्याची अंमलबजावणी होणार कशी? इतक्याउपर आम्ही म्हणतो तोच कायदा आहे असे विद्यापीठ अनुदान आयोगाचे म्हणणे असेल तर, असा कसा हा तुमचा कायदा? दहा वर्षामध्ये १० हजारावर लोक सेवेत भरती झाले तेंव्हा ते कायदाकर्ते आयोग काय करीत होते? तो कायदा होता आणि आम्ही झोपा काढत होतो अशी दोन होकाराची तरी भूमिका घ्यावी लागेल किंवा आम्ही झोपलेले नव्हतो व तो त्यावेळी कायदा नव्हता अशी दोन नकाराची तरी भूमिका घ्यावी लागेल. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या गलथानपणामुळे होरपळून निघालेल्या महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांना, "भूमिकाच न घेण्याची विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका" अजिबात मान्य नाही हे ठामपणे नमूद करण्यात येत आहे.**

# शनिवार, दिनांक १ ऑक्टोबर २००५

## रोजी दुपारी १ वाजता

### पुणे येथील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहसचिवांच्या कार्यालयावर

# राज्यस्तरीय मोर्चा

विद्यापीठ अनुदान आयोगाने मा. उच्च न्यायालयाची क्षमा मागितली पाहिजे.

(११) विद्यापीठ अनुदान आयोगाने यासंदर्भात एक एका प्रकरणाचा गुणवत्तेवर स्वतंत्रपणे विचार करण्याचे ठरविले आहे. सबंध देशभरासाठी धोरण ठरवून निर्णय घेणे त्यांना शक्य नाही असे दिसून येते. महाविद्यालयांच्या इमारती, ग्रंथालयांच्या इमारती, इतर पायाभूत सुविधा उभारण्यासाठी दरवर्षी करोडो रुपयाच्या ग्रँटस् विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे देशभर दिल्या जातात. त्याबाबतीतसुद्धा प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्रपणे गुणवत्तेवरच निर्णय तेथे घेतला जातो. अशा निर्णयात त्यांना मदत करण्यासाठी मदतनीस म्हणून काम करणारे 'गुणवान दीपस्तंभ' ठायी ठायी उदयमान झालेले आहेत. नेटसेट पात्रता परीक्षा लागू केल्यामुळे स्वतंत्रपणे एक एका प्रकरणाचा गुणवत्तेवर विचार करण्यासाठी एक नवीन दालन आता नव्याने या अंतर्बाह्य मदतनीसांना उपलब्ध झालेले आहे. धोरणात्मक निर्णयाचा एक दोष असा असतो की एका फटक्यात शेकडो लोकांचा एकदम निकाल लागत असल्यामुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष व्यक्तिगत संपर्क होवू शकत नाही. प्रत्येक प्रकरण स्वतंत्रपणे तपासण्यात जी 'मजा' असते ती धोरणात्मक निर्णय घेवून प्रश्नाचा निकाल लावण्यात असू शकत नाही. एक एक प्रकरण तपासायला घेतो म्हटले तर कसे? ते चारही बाजूने बारकाईने तपासता येते. 'गुणवत्ते'वर कोणात किती 'दम' आहे याचा 'कस' लावता येतो. शिवाय अनेक भावी प्राध्यापकांना मौल्यवान अशी 'दिल्ली दर्शन सुविधा' सेवेला सुरुवात करण्यापूर्वी किंवा केल्याबरोबरच विनामूल्य उपलब्ध होते. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे 'कट ऑफ डेट' पूर्वीच्या महाराष्ट्रातील प्रकरणी व्यक्तिशः तपासण्याची सुविधा विद्यापीठ अनुदान आयोगाला उपलब्ध होणे शक्य नाही ही गोष्ट जितक्या लवकर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात येईल तितके ते सर्वांनाच हितकारक होईल.

**११.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विधिसल्लागारांच्या सल्ल्यानंतरही विद्यापीठ अनुदान आयोगाने आपले वर्तन दुरुस्त केलेले नसल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निषेधार्थ पुढील आंदोलनात्मक कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे. :-

**(१) महासंघाच्या नेतृत्त्वाखाली शनिवार, दिनांक १ ऑक्टोबर २००५ रोजी दुपारी १ वाजता पुणे येथील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहसचिवांच्या कार्यालयावर राज्यस्तरीय मोर्चाचे आयोजन केले जाईल. पुणे विद्यापीठाच्या मुख्यगेटवरून हा मोर्चा दुपारी १ वाजता निघेल. "महाराष्ट्रातील याबाबतच्या स्थितीकडे विद्यापीठ अनुदान आयोगाने डोळे उघडून पहावे असे आयोगाला कळवा" अशी सहसचिवांना विनंती केली जाईल.**

**(२) शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर २००५ रोजी दुपारी ४.०० वाजता सर्व विद्यापीठांच्या मुख्यालयावर विद्यापीठस्तरीय मोर्चाचे आयोजन करुन 'वस्तुस्थिती' विद्यापीठ अनुदान आयोगाला कळविण्यात यावी अशी मा. कुलगुरुंना विनंती करण्यात येईल.**

**(३) सोमवार, दिनांक ५ डिसेंबर २००५ रोजी १२ ते ५ दरम्यान पुणे येथील विद्यापीठ अनुदान आयोग सहसचिवांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन आयोजित केले जाईल. "विद्यापीठ अनुदान आयोगात चाललेली एवढी मोठी भंपकगिरी लक्षात आणून देण्यात हे कार्यालय अपयशी झाले असेल तर सहसचिवांचे हे कार्यालय बंद करा" अशी मागणी केली जाईल.**

**(४) सप्टेंबर व ऑक्टोबर २००५ या दोन महिन्याच्या काळात जिल्हास्तरीय मेळावे आयोजित करुन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बिनडोक निर्णयाची तपशीलवार माहिती लोकांपर्यंत पोचविण्याचे काम पार पाडले जाईल.**

(५) यानंतरही विद्यापीठ अनुदान आयोगाने मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निर्णया विरोधातील आपले वर्तन चालूच ठेवल्यास डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक होवून आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेतला जाईल.

**१२.** अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्त्वाखाली ३२ दिवस चाललेला प्राध्यापकांचा देशव्यापी संप केंद्र शासनाशी ॲग्रिमेंट होऊन दिनांक ४ सप्टेंबर १९८७ रोजी मागे घेण्यात आला. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या वतीने अध्यक्ष प्रा. के.के.ठेकेदत्त व सचिव प्रा. मृणमय भट्टाचार्य एका बाजूला व दुसऱ्या बाजूला केंद्र शासनाचे सचिव श्री. अनिल बोरडीया व विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष यांच्यामध्ये झालेले हे ॲग्रिमेंट होते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षांनी तळमळीने प्रयत्न करूनसुद्धा केंद्र शासनातील नोकरशाहीच्या दुराग्रही वृत्तीमुळे त्यावेळी शिक्षकांवर हा संप लादण्यात आला होता. संप समाप्तीनंतर विद्यापीठ अनुदान आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष मा. प्रा. यशपाल यांनी २९ सप्टेंबर १९८७ रोजी "AN OPEN LETTER TO FELLOW ACADEMICS AND FRIENDS OF ACADEMIA " या मथळ्याचे एक मुद्रित प्रसारण देशभर प्रसृत केले होते. त्यातील पुढील उल्लेख महत्वपूर्ण आहे. :-

"Agreement with AIFUCTO : On the 4th September, we came to an agreement with All India Federation of University and College Teachers Organizations (AIFUCTO). AIFUCTO withdrew the strike on the basis of this agreement. In my view this agreement could have been arrived at even earlier, even before the strike, but it seems some events are pre-destined. It may appear that the discussions with AIFUCTO started just three or four days before the agreement. This is not true. I don't remember exactly, but there were something like fifteen direct or indirect contacts, messages and meetings during that one month. The UGC, the Government and AIFUCTO all dispensed with some formal procedures to come to this agreement .... and all this was done in good faith and has not been repudiated by formal mechanisms of the parties involved."

चार आठवड्याच्या काळात त्यावेळच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी १५ वेळा संघटनेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संपर्क केला होता. आजच्या आमच्या अध्यक्षांना चार वर्षाच्या काळात वारंवार विनंती केल्यानंतरही एकदासुद्धा संघटनेशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संपर्क करण्यासाठी वेळ मिळाला नाही. आज विद्यापीठ अनुदान आयोगाचा "Informal Mechanism " काही कुठे अस्तित्वात असल्यासारखा दिसत नाही. इतकेच नव्हेतर त्यांचा Formal mechanism सुद्धा मोडून पडल्यासारखा दिसतो. हे महाराष्ट्रातील प्राध्यापकांचे मोठेच दुर्दैव होय. "It seems that some events are pre-destined" हे मा. श्री. यशपाल यांचेच म्हणणे खरे आहे.

(C.R. Sadasivan)
President

(E.H. Kathale)
General Secretary

MUMBAI, 11TH SEPTEMBER 2005

*****

### जिल्हा मेळाव्यांचे आयोजन

संघटनेच्या वतीने जिल्हा मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठका जिल्हा अधिवेशनांच्या स्वरुपात होतील. या बैठका यशस्वी करण्यासाठी सर्व स्थानिक, तालुका व जिल्हा युनिटच्या सभा घेण्यात याव्यात. या बैठकीच्या स्वतंत्रपणे सूचना काढून या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व स्तरावरील पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत अशी त्यांना विनंती आहे.

आपला विनित
**डॉ. एकनाथ कठाळे,**
सचिव 'नुटा'

# विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बिनडोकपणाचा तीव्र निषेध

## आयोगाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर केलाच पाहिजे व हायकोर्टाचा अवमान केल्याबद्दल क्षमा मागितली पाहिजे.

# जिल्हास्तरीय मेळाव्यांचे आयोजन

नेट सेट बाबतच्या दिनांक ३ ऑगस्ट २००५ रोजीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्राबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची प्रतिक्रिया नमूद असलेल्या, संघटनेच्या कार्यकारी मंडळाने मंजूर केलेल्या, प्रस्तावाचा परिच्छेद ११ (४) पुढील प्रमाणे : "सप्टेंबर व ऑक्टोबर २००५ या दोन महिन्याच्या काळात जिल्हास्तरीय मेळावे आयोजित करुन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बिनडोक निर्णयाची तपशीलवार माहिती लोकांपर्यंत पोचविण्याचे काम पार पाडले जाईल." सदरहू निर्णयाप्रमाणे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जिल्हास्तरीय मेळाव्यांचे आयोजन केलेले आहे. सर्व प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. एकनाथ कठाळे, सचिव, नुटा**

**तक्ता**

| अ.नं. व जिल्ह्याचे नांव | बैठकीचा दिवस व दिनांक | बैठकीची वेळ | बैठकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ २ | ३ | ४ | ५ |
| १. भंडारा | रविवार, १८.०९.२००५ | सकाळी ११.३० वा. | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा |
| २. गोंदिया | रविवार, १८.०९.२००५ | दुपारी ५.०० वा. | डी.बी.सायन्स कॉलेज, गोंदिया. |
| ३. चंद्रपूर | शनिवार, २४.०९.२००५ | सकाळी ११.०० वा. | एस.पी. कॉलेज, चंद्रपूर. |
| ४. गडचिरोली | शनिवार, २४.०९.२००५ | दुपारी ५.०० वा. | शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली. |
| ५. वर्धा | रविवार, २५.०९.२००५ | सकाळी ९.०० वा. | यशवंत महाविद्यालय, वर्धा. |
| ६. नागपूर शहर | रविवार, २५.०९.२००५ | दुपारी ३.०० वा. | प्रेरणा कॉलेज ऑफ कॉमर्स रेशिमबाग चौक, नागपूर. |
| ७. नागपूर ग्रामिण | रविवार, २५.०९.२००५ | दुपारी ३.०० वा. | प्रेरणा कॉलेज ऑफ कॉमर्स रेशिमबाग चौक, नागपूर. |
| ८. यवतमाळ | शुक्रवार, २३.०९.२००५ | दुपारी ४.०० वा. | अण्णासाहेब खडसे शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ. |
| ९. अमरावती | सोमवार, २६.०९.२००५ | दुपारी ४.०० वा. | भारतीय महाविद्यालय, अमरावती. |
| १०. बुलढाणा | गुरुवार, २९.०९.२००५ | दुपारी ३.०० वा. | जी.एस. महाविद्यालय, खामगाव |
| ११. अकोला व १२. वाशिम | गुरुवार, २९.०९.२००५ | दुपारी ५.०० वा. | आर.एल.टी.सायन्स कॉलेज, अकोला. |

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/ 2001/4448 Licenced to post without prepayment **LICENCE NO. NR/ATI/78/2002** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **16.09.2005**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---

To,............................................................

............................................................

............................................................

............................................................

............................................................